प्रमाणित करण्यात येते की सदर वहीला एकुण ०१ ते ६६ जोडपाने असून सदर वहीचा उपयोग अल्युमनीअसोसिएशनच्या सभेतील ठराव वही म्हणून करण्यात येत आहे.

Chairman
Alumni Association
Matoshri Ashatai Kunawar Arts,
Commerce & Science Women's College
Hinganghat - 442301, Dist. Wardha

Shrikrupa

कार्यकारिणीची सभा - १ Date / /

दिनांक : २६/०१/२०२३

दिनांक - ०१/०१/२०२३ च्या नोटीस द्वारे आज दिनांक २६/०१/२०२३ रोजी सकाळी १०:०० वाजता विद्या विकास शिक्षण संस्था हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा येथे माजी विद्यार्थ्यांची अल्युमिनी संस्था स्थापण्या करिता सभा आयोजित करण्यात आली त्यात खालील ठराव घेण्यात आले.

सभेला खालीलप्रमाणे सदस्यगण उपस्थित होते.

	स्वाक्षरी
१) शालीनी राजेंद्र देशमुख	[signature]
२) देवयानी उमेश शिंगोटे	Ushingate
३) अंकिता केशवराव ढगे	[signature]
४) प्राजक्ता सुरेश गुडधे	[signature]
५) अंजली गिरिधर मानखेडे	[signature]
६) तुळशी प्रभाकर सोरटे	T.P. Sorte
७) वैष्णवी ज्ञानेश्वर उगले	[signature]

Date / /

विषय क्रमांक १ – संस्थेस नाव देणे

ठराव क्रमांक १ – सभेमध्ये महाविद्यालय अंतर्गत माजी विद्यार्थ्यांच्या मार्फत धर्मादाय व सामाजिक कार्यासाठी एक बहुउद्देशिक संस्था स्थापन करण्याचे ठरले. व त्या संस्थेस मा. श्री. कुणावार कला वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय अल्युमनी असोसिएशन हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा असे नाव द्यायचे सर्वानुसार ठरले.

सुचक : अंकीता केशवराव ढगे

अनुमोदक : साक्षी राजेंद्र देशमुख

ठराव सर्वानुमते मंजुर, तसेच या सभेमध्ये खालील प्रमाणे इतर विषयांवर सारासार चर्चा करून संस्था स्थापने विषयी विविध निर्णय घेण्यात आले.

विषय क्रमांक २- संस्थेच्या अध्यक्षांची व
पदाधिकाऱ्यांची निवड करणे

ठराव क्रमांक २- श्री. साक्षी राजेंद्र देशमुख यांची निवड संस्थेच्या अध्यक्षपदी करण्याचे सर्व हजर सभासदांनी सुचविले व त्यास सर्वांनी मंजुरी दिली. त्याच वेळी संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या इतर पदाधिकाऱ्यांची व सदस्यांची निवड करण्यात आली. त्यांची यादी खाली दिली आहे.

अ.क्र.	नाव	पद
१.	साक्षी राजेंद्र देशमुख	अध्यक्ष
२.	देवयानी उमेश शिंगोटे	उपाध्यक्ष
३.	अंकीता केशवराव ढगे	सचिव
४.	प्राजक्ता सुरेश गुडघे	उपसचिव
५.	अंजली गिरिधर मानखेडे	कोषाध्यक्ष
६.	तुळशी प्रभाकर सोरटे	सदस्य
७.	वैष्णवी ज्ञानेश्वर उगले	सदस्य

सुचक : तुळशी प्रभाकर सोरटे
अनुमोदक : वैष्णवी ज्ञानेश्वर उगले

ठराव सर्वानुमते मंजुर

Date / /

विषय क्रमांक २ :- संस्थेच्या सभासदांचे प्रकार अधिकार, वर्गणी / फी, व कार्यकारी मंडळाची मुदत ठरविणे.

ठराव क्रमांक ३ :- संस्थेच्या पहिल्या कार्यकारि मंडळाच्या सभासदांना आजीव सदस्याचा दर्जा देण्याचे व त्यांची फी / वर्गणी रु ५००/- प्रत्येकी जमा करण्यांत येईल असे सर्वानुमते ठरले.

- संस्थेस एकरकमी रुपये ५००/- (अक्षरी रु पाचशे) देणाऱ्या वय वर्ष १८ वरिल भारतीय व्यक्तीस अर्ज केल्यानुसार संस्थेचा आजिव सभासद / कायमस्वरुपी सभासद म्हणुन संबोधले जाईल. सदर वर्गणी भरल्यानंतर त्या व्यक्तीच्या अर्जास कार्यकारि मंडळाने मंजुरी दिल्यानंतरच पैसे भरल्याचे दिनांकापासून त्या व्यक्तीस आजीव सभासदाचा दर्जा प्राप्त होईल. आजिव सभासदांना मतदानाचा तसेच निवडणूकीस उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार असेल.

Shrikrupa

Date ___/___/___

• संस्थेकडे मासिक / वार्षिक काला-वधीसाठी वर्गणी / फी रुपये २५/- (अक्षरी - पंचवीस) भरणाऱ्या वय वर्ष १८ वरील भारतीय व्यक्तीस अर्ज केल्यापासून संस्थेच्या सर्व-साधारण सभासद म्हणून संबोधले जाईल. सदर वर्गणी भरल्यानंतर त्या व्यक्तींच्या अर्जास कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यानंतरच पैसे भरल्याचे दिनांकापासूनच त्या व्यक्तीस सर्वसाधारण सभासदाचा दर्जा प्राप्त होईल. सर्वसाधारण सभासदाला त्याच्या सभासदत्वाच्या कालावधीतच फक्त मतदानाचा अधिकार असेल. वार्षिक वर्गणी देणाऱ्या सभासदांना त्यांच्या सभासदत्वाच्या कालावधीतच मतदानाच्या व निवडणूकीस उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार असेल मात्र ज्या सभासदची संपूर्ण वर्गणी आलेली नाही अशा सभासदांना मत देण्याचा अधिकार अथवा निवडून येण्याचा अधिकार राहणार नाही.

• संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या कार्यकाल हा पाच वर्षाचा असेल.

Page No.
Date / /

सुचक : साक्षी राजेंद्र देशमुख

अनुमोदक : वैष्णवी ज्ञानेश्वर उगले

विषय क्रमांक ४ :- संस्थेचे कागदपत्र तयार करणे व संस्था नोंदणीच्या दाखल प्रस्तावात बदल करण्याचे अधिकार.

ठराव क्रमांक ४ :- उपरोक्त संस्थेचे विधान-पत्र, नियम - नियमावली आणि इतर कागदपत्रे तयार करण्यात आली, ती सर्व उपस्थित सभासदांना वाचून दाखविण्यात आली व सर्वसभासदांनी मान्यता दिली. तसेच सदरचा नोंदणी प्रस्ताव मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडे संस्थेचे अर्जदार साक्षी राजेंद्र देशमुख यांनी दाखल करावे असे सर्वानुमते ठरले. त्यांनतर संस्थेच्या दाखल प्रस्तावामध्ये आवश्यकतेनुसार संस्था हितार्थ योग्य त फेरफार करणे, बदल करणे, नविन कागदपत्रे दाखल करणे,

सरकारी कार्यालयांस दिलेल्या
तारखांना हजर राहणे, संस्थेच्या
नोंदणीकृत करणे कामी अध्यक्ष/
खजिनदार श्री राजेंद्र देशमुख
यांना सर्वाधिकार देण्याचे ठरले.

सुचक : सुवर्णा प्रभाकर थोरटे

अनुमोदक : बेबाती ज्ञानेश्वर उगले

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रमांक ५ :- संस्थेच्या बँक खाते
चालविण्याच्या अधिकारांबाबत.

ठराव क्रमांक ५ :- संस्थेजवळ असलेल्या ठेवी.
शिल्लक रक्कम कोणत्याही राष्ट्रीयत्व अथवा अनुसूचीत शेड्यूल
बँकेमध्ये उघडण्यात येईल. त्यात
संस्थेचे अध्यक्ष, सचिव, खजिनदार
या पदाधिकाऱ्यांपैकी कोणत्याही
दोन सदस्यांच्याच संयुक्त सहीने
पैशाची देवाण - घेवाण करणे
आवश्यक राहील. संस्थेचे शक्य
तितके व्यवहार हे धनादेशा -
द्वारे करण्यात येईल.

Shrikrupa

Date / /

सूचक : अंकिता केशवराव ढगे

अनुमोदक : प्राजक्ता सुरेश गुडधे

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रमांक ६ :- संस्थेच्या कार्यालयाच्या
पत्त्याबाबत.

ठराव क्रमांक ६ :- संस्थेच्या कार्यालयाच्या
पत्याबाबत आणि पत्रव्यवहाराच्या
पत्याबाबत सभासदांनी सविस्तर
चर्चा केली. साधकबाधक
चर्चेनंतर संस्थेचे कार्यालय
खालील पत्यावर ठेवण्यास
सर्व सभासदांनी मंजुरी दिली.

नाव - मा. आ. कुणावार कला
वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय
अल्युमनी असोसिएशन हिंगणघाट ता.
हिंगणघाट जि. वर्धा.

पत्ता : द्वारा विद्या विकास शिक्षण
संस्था हिंगणघाट ता.
हिंगणघाट जि. वर्धा.

Shrikrupa

सुचक : साक्षी राजेंद्र देशमुख

अनुमोदक : देवयानी उमेश शिंगोटे

विषय क्रमांक ५ :- वेळेवर येणारे विषय

ठराव क्रमांक ५ :- या व्यतिरिक्त वेळेवर कोणतेही विषय आले नाही नंतर अध्यक्षांनी सर्वांचे आभार मानले व सभा संपल्याचे जाहिर केले.

Chairman
Alumni Association
Matoshri Ashatai Kunawar Arts,
Commerce & Science Women's College,
Hinganghat - 442301, Dist. Wardha

Page No.

कार्यकारिणीची सभा क्रमांक - २

Date

दिनांक - १२/१०/२०२३

दिनांक - ०२/१०/२०२३ रोज सोमवार च्या नोटीस द्वारे आज दिनांक १२/१०/२०२३ रोज दुपारी २:०० वाजता मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट येथे अल्युमनी - असोसिएशन द्वारे सभा घेण्यात आली. सभेमध्ये खालील ठराव घेण्यात आले.

सभेला खालील प्रमाणे सदस्यगण उपस्थित होते.

	स्वाक्षरी
१) साक्षी राजेंद्र देशमुख	S.Deshmukh.
२) देवयानी उमेश शिंगोटे	Shingote
३) अंकिता केशवराव ढगे	AKdhage
४) प्राजक्ता सुरेश गुडधे	P.gudadhe
५) अंजली गिरिधर मानखेडे	A.Mankhede
६) तुळशी प्रभाकर सोरटे	T. P. Sorte
७) वैष्णवी ज्ञानेश्वर उगले	[illegible]

विषय क्रमांक १ : मागील सभेचा ईतीवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्रमांक १ : मागील सभेच्या ईतीवृत्ताचे वाचन करुन उपस्थित सदस्यांनी ईतीवृत्तास मंजुरी दिली.

विषय क्रमांक २ : मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय अल्युमनी असोसिएशन, हिंगणघाट या संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते सुरु करण्याबाबत.

ठराव क्रमांक २ : मा. धर्मदाय आयुक्त वर्धा यांनी अल्युमनी असोसिएशन ला दि. १२/०१/२०२३ ला मान्यता दिली त्यानुसार मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट अल्युमनी असोसिएशन असे असुन नियमानुसार संस्थेच्या आर्थिक देवाण घेवाण करण्याकरीता संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते सुरु करण्यासंबंधी अध्यक्षांनी सभासदांना सांगितले.

Shrikrupa

Date / /

त्यावर सविस्तार चर्चा करून संस्थेने खाते बँक ऑफ महाराष्ट्र शाखा हिंगणघाट मध्ये सुरु करून खात्याचे नाव - मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय अल्युमनी असोसिएशन, सदर खाते संस्थेच्या अध्यक्ष कु. साक्षी राजेंद्र देशमुख यांच्या एकात्य सहिणे सुरु करावे असे सभेत ठरविण्यात आले. ठराव एकमताने मंजुर करण्यात आला.

विषय क्र. २ : माजी विद्यार्थी मेळावा घेण्याबाबत तारिख निश्चित करणे.

ठराव क्र. २ : शैक्षणिक सत्र २०२३ - २०२४ या शैक्षणिक वर्षामध्ये माजी विद्यार्थीनी सभा घेण्याबाबत मा. अध्यक्षांनी असे सांगितले की माजी विद्यार्थी समितीद्वारे कार्यक्रमाचा आराखडा तयार करून तो कार्यान्वीत करावयाचा आहे. यात आपली सर्वांची मंजूरी आहे. त्यावर सर्व सभासदामध्ये सखोल चर्चा होऊन दिनांक २६/१०/२०२३ रोज गुरुवार ठिक १:०० वाजता

मातोश्री आसांनाई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट येथे ऑडिटोरियम हॉल मध्ये माजि विद्यार्थ्यांनी सभा घेण्याचे ठरले.
ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

विषय क्र. ४ : माजी विद्यार्थ्यांचे feedback form भरून घेण्याबाबत.

ठराव क्र: ४ : मा. अध्यक्ष कु. साक्षी राजेंद्र देशमुख यांनी असे सांगितले की जे माजी विद्यार्थी सभेला उपस्थित राहतील व काहि विद्यार्थी काहि कारनास्तव येऊ शकत नाहि त्यांचं feed back form भरुण घेणे आवश्यक आहे. व form भरुण घेण्याची जबाबदारि समिती सदस्य कु. वैष्णवी उगले यांच्यावर सोपवली आहे.
त्यावर सर्व समिती सदस्यांनी आपली मंजूरि दर्शविली. कु वैष्णवी उगले यांच्याद्वारा फॉर्म भरून घेण्याचे ठरवले.
ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

Date / /

विषय क्र. ५ : माजी विद्यार्थी मेळाव्यामध्ये अल्पोआहाराची व्यवस्था करण्याबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ५ : मा. अध्यक्ष कु. शाश्वी देशमुख यांनी असे सांगितले की मेळाव्यामध्ये येणाऱ्या प्रत्येक माजी विद्यार्थ्याकरिता अल्पोआहाराची व्यवस्था करणे आवश्यक आहे. व त्याकरिता लागणाऱ्या निधीची व्यवस्था करून देण्याचे सांगितले.
त्यावर सर्व सदस्यांनी आपली मंजुरी दर्शविली.
ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

विषय क्र. ६ : सभासद नोंदणी फी जमा करण्याबाबत.

ठराव क्र. ६ : ॲल्युमनाय असोसिएशन ही मा. धर्मदाय आयुक्त, वर्धा यांच्याकडून नोंदणी केल्या गेली व या समितीचा फंड गोळा करून विद्यार्थ्यांवर व इतर शैक्षणिक कामावर खर्च करण्याकरिता निधीची अत्यंत आवश्यक आहे.

Shrikrupa

करीता मेळाव्यास आलेल्या माजी-
विद्यार्थ्यांकडून निधी गोळा करण्याचे
काम हे कु. तुळशी मोरटे यांच्यावर
सोपविण्यात आले. यावर सर्व
सभासदामध्ये चर्चा होऊन सर्व सभास-
दांनी यावर मंजुरी प्रदान केली.
ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

विषय क्र. ७ : मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या इतर विषयावर चर्चा करणे.

ठराव क्र. ७ : सभेमध्ये कोणताही विषय चर्चेकरिता नसल्यामुळे सभा अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सभेमधील सर्व उपस्थित सदस्यांचे कु. अंजली मानखेडे यांनी आभार मानले व व सभा संपन्न झाली असे जाहिर केले.

Chairman
Alumni Association
Matoshri Ashatai Kunawar Arts,
Commerce & Science Women's College,
Hinganghat - 442301, Dist. Wardha